# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**साहेबरावजी बुट्टपाटील स्मृती व्याख्यानमाला**

# चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून उभी करा : मुळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू असून त्यांना आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यांतून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून सुरु करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयातील निवृत्त सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे' या विषयावर ते बोलत होते.

प्रशासनाची कार्यसंस्कृती ही जनतेशी संवादी असायला हवी. प्रत्येकाने मातृभाषेचा अभिमान ठेवावा. ज्या क्षेत्रात आपण आहोत, तेथे चांगले करण्याचा प्रयत्न करावा. हुतात्मा राजगुरू यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका, अशी अपेक्षा व आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कार्याचा गौरव करून 'मी जरी काल परराष्ट्र सेवेतून निवृत्त असलो, तरी त्यांच्या कर्मभूमीत मी सेवाप्रवृत्त होण्याचा संकल्प करीत असल्याचे ते म्हणाले. या वेळी त्यांनी उपस्थितांना नवसमाजाच्या निर्मितीसाठी सर्वधर्मसमभावाची, वसुंधरेच्या जतनाची आणि मानवी मूल्यांची जोपासना करण्याची शपथ दिली.

> चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहणे, हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण असून समाजसेवेची आस मनात असणारे कार्यकर्ते राजकारणात असावेत. सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यातील विश्वास निर्देशांक किती, यावर त्या देशाची प्रगती अवलंबून असल्याचे ते म्हणाले.
>
> **- डॉ. ज्ञानेश्वर मुळे,**
> निवृत्त सचिव

सदस्या, जिल्हा परि
मा. श्री. अमोल पव
सदस्य, पं.स.खेड
श्री. गणेश सदाशिव मांडे
सरपंच, आंबेठाण
श्री. काळूराम बबन मांडे
उपसरपंच, आंबेठाण
समस्त ग्रामपंचाय
स्थळ : जिल्हा
RM

# चांगुलपणाची चळवळ उभारा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला बुट्टे पाटील व्याख्यानमाला

**राजगुरुनगर, ता. २ : ''संपूर्ण देशात असहकारिता आणि द्वेषाचे वातावरण आहे. एकमेकांत लढण्यात खर्च होणारी ऊर्जा विधायक कामांकडे वळविणे, हे आपल्यापुढचे मोठे आव्हान आहे. त्यासाठी राजकारण, शिक्षण, स्वच्छता आदी प्रत्येक पातळीवर एक सर्वंकष चांगुलपणाची चळवळ सुरू करावी लागेल,'' असे मत निवृत्त परराष्ट्र सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी व्यक्त केले.**



ज्ञानेश्वर मुळे

### व्यवस्थांचे सक्षमीकरण आवश्यक : कुबेर

''भारत महासत्ता होण्यासाठी व्यवस्थांचे सक्षमीकरण आवश्यक आहे. कुणी एखादी व्यक्ती येऊन उद्धार करेल, या भाबड्या भावनेतून बाहेर येऊन वास्तवदर्शी विचारातून उद्योगशीलता, औद्योगीकरण, संपत्तीनिर्मिती, ऊर्जानिर्मिती या बाबींवर काम केले पाहिजे. देशाला अर्थसाक्षरतेची गरज आहे. शिक्षणात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून उत्तम आणि निरोगी शिक्षणव्यवस्था उभारण्याची गरज आहे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार गिरीश कुबेर यांनी केले. साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते.

राजगुरुनगर (ता. खेड) येथील साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे' या विषयावर डॉ. मुळे बोलत होते.

ते म्हणाले की, फुले-शाहू-आंबेडकर यांनी सत्यशोधन चळवळ थांबली आहे. आज शिक्षण गावोगावी पोचले, पण परिवर्तन पोचले नाही. राजकीय संस्कृतीत आमूलाग्र बदलाची गरज आहे. स्वच्छ भारत अभियानात परिसराबरोबर, मनांचीही स्वच्छता करायला हवी.

''सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यातील विश्वास निर्देशांक किती? त्यावर त्या देशाची प्रगती अवलंबून आहे. चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहणे हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण असून समाजसेवेची आस मनात असणारे कार्यकर्ते राजकारणात असले पाहिजेत. याशिवाय प्रशासनाची कार्यसंस्कृती ही जनतेशी संवादी असायला हवी,'' असे ते म्हणाले.

प्रा. उमेश जगताप यांनी सूत्रसंचालन केले. वक्त्यांचा परिचय डॉ. बी. डी. अनुसे यांनी करून दिला. ऋग्वेद काळे याने आभार मानले.

# चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून सुरू करा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : राजगुरुनगरला व्याख्यानमालेत युवकांना आवाहन

**राजगुरुनगर, दि. १ (प्रतिनिधी)** - गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू असून त्याला आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यातून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करून युवकांनी आपली ऊर्जा विधायक कामांकडे वळविण्यासाठी चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून सुरू करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयातील कालच निवृत्त झालेले सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.



राजगुरुनगर : येथे व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना डॉ. मुळे.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. संजय शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे स्वागत व सत्कार संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

डॉ. मुळे म्हणाले, आज शिक्षण गावोगावी पोचले असले तरी समाज परिवर्तनाची चळवळ थांबली आहे. त्यासाठी समाजाच्या राजकीय व सामाजिक संस्कृतीत आमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानाप्रमाणे पहिल्यांदा मनाची स्वच्छता करायला हवी. शिक्षणाला नाविन्याची जोड देऊन तंत्रज्ञानाचा वापर समाजजीवन संपन्न करायला हवे. समाजाच्या सर्व स्तरांतील लोकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणायला हवे. यासाठी प्रत्येकाच्या मनातील प्रेमाचे दिवे पेटवून चांगुलपणाची लोकचळवळ सुरु करणे गरजेचे आहे. . पासपोर्टसारखी क्टील वाटणारी सेवा सामान्यांपर्यंत पोचविताना मागील एका वर्षात तीनशेच्या आसपास पासपोर्ट सेवा केंद्र देशात सुरु केली असून प्रत्येक लोकसभा मतदार संघात पासपोर्ट कार्यालय सुरु करायचे आहे. आपल्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातही पासपोर्ट शिबीर आयोजित केले जाईल असे ते म्हणाले.

हुतात्मा राजगुरु यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका अशी अपेक्षा व आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कार्याचा गौरव करून मी जरी काल परराष्ट्र सेवेतून निवृत्त झालो असलो तरी त्यांच्या कर्मभूमीत मी सेवाव्रत होण्याचा संकल्प करीत असल्याचे ते म्हणाले. यावेळी त्यांनी उपस्थितांना नवसमाजाच्या निर्मितीसाठी सर्वधर्म समभावाची, वसुंधैवच कुटुंबकम आणि मानवी मूल्यांच्या जपणुकीची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. वक्त्यांचा परिचय डॉ. बी. डी. अनुसे यांनी तर ऋग्वेद काळे याने आभार मानले.

> प्रशासनाची कार्यसंस्कृती ही जनतेशी संवादी असायला हवी. प्रत्येकाने मातृभाषेचा अभिमान ठेवावा. ज्या क्षेत्रात आपण आहोत तेथे चांगले करण्याचा प्रयत्न करावा. चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहणे हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण आहे. समाजसेवेची आस मनात असणारे कार्यकर्ते राजकारणात असावेत. सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यातील विश्वास निर्देशांक किती? त्यावर त्या देशाची प्रगती अवलंबून असते.
>
> -डॉ. ज्ञानेश्वर मुळे, सचिव परराष्ट्र मंत्रालय

# 'चांगुलपणाची लोकचळवळ उभी करण्याची गरज'

**राजगुरुनगर,** (वार्ताहर) : गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू असून त्याला आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यातून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करून युवकांनी आपली उर्जा विधायक कामांकडे वळवण्यासाठी चांगुलपणाची लोकचळवळ स्वतःपासून सुरु करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयातील निवृत्त सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे स्वागत व सत्कार संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे बोलताना पुढे म्हणाले की आज शिक्षण गावोगावी पोचले असले तरी समाज परिवर्तांची चळवळ थांबली आहे. त्यासाठी समाजाच्या राजकीय व सामाजिक संस्कृतीत अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानाप्रमाणे पहिल्यांदा मनाची स्वच्छता करायला हवी. शिक्षणाला नाविन्याची जोड देऊन तंत्रज्ञानाचा वापर समाजजीवन संपन्न करण्यासाठी करायला हवा. समाजाच्या सर्व थरातील लोकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणायला हवे. यासाठी प्रत्येकाच्या मनातील प्रेमाचे दिवे पेटवून चांगुलपणाची लोकचळवळ सुरु करणे गरजेचे आहे.

# लोकचळवळ उभारण्याची गरज

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे मत

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू आहेत त्याला आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यातून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करून युवकांनी आपली उर्जा विधायक कामांकडे वळवावी. त्यासाठी चांगुलपणाची लोकचळवळ सुरू करण्याची गरज असल्याचे मत परराष्ट्र मंत्रालयातील निवृत्त सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी व्यक्त केले.



येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे' या विषयावर ते बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. बी. डी. अनुसे, ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

या वेळी मुळे म्हणाले, की सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यातील विश्वास निर्देशांकावर देशाची प्रगती अवलंबून असते. चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहणे हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण आहे. समाजसेवेची आस मनात असणारे कार्यकर्ते राजकारणात असावेत. प्रशासनाची कार्यसंस्कृती ही जनतेशी संवादी असावी. प्रत्येकाने मातृभाषेचा अभिमान ठेवावा. हुतात्मा राजगुरू यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका, असे विद्यार्थ्यांना आवाहन करत त्यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कार्याचा गौरव केला.

प्रभात पुणे, शनिवार, दि. २ फेब्रुवारी २०१९

# चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून सुरू करा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे : राजगुरुनगरला व्याख्यानमालेत युवकांना आवाहन

राजगुरुनगर, दि. १ (प्रतिनिधी) - गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू असून त्याला आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यातून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करून युवकांनी आपली ऊर्जा विधायक कामांकडे वळवण्यासाठी चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून सुरू करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयातील कालच निवृत्त झालेले सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.



राजगुरुनगर : येथे व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना डॉ. मुळे.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. संजय शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे स्वागत व सत्कार संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

डॉ. मुळे म्हणाले, आज शिक्षण गावोगावी पोचले असले तरी समाज परिवर्तनाची चळवळ थांबली आहे. त्यासाठी समाजाच्या राजकीय व सामाजिक संस्कृतीत आमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानाप्रमाणे पहिल्यांदा मनाची स्वच्छता करायला हवी. शिक्षणाला नाविन्याची जोड देऊन तंत्रज्ञानाचा वापर समाजजीवन संपन्न करायला हवे. समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणायला हवे. यासाठी प्रत्येकाच्या मनातील प्रेमाचे दिवे पेटवून चांगुलपणाची लोकचळवळ सुरू करणे गरजेचे आहे. पासपोर्टसारखी कठीण वाटणारी सेवा सामान्यांपर्यंत पोचविताना मागील एका वर्षात तीनशेच्या आसपास पासपोर्ट सेवा केंद्र देशात सुरू केली असून प्रत्येक लोकसभा मतदार संघात पासपोर्ट कार्यालय सुरू करायचे आहे. आपल्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातही पासपोर्ट शिबीर आयोजित केले जाईल असे ते म्हणाले.

हुतात्मा राजगुरू यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका अशी अपेक्षा व आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कार्याचा गौरव करून मी जरी काल परराष्ट्र सेवेतून निवृत्त झालो असलो तरी त्यांच्या कर्मभूमीत मी सेवाप्रवृत्त होण्याचा संकल्प करीत असल्याचे ते म्हणाले. यावेळी त्यांनी उपस्थितांना स्वच्छभारताच्या निर्मितीसाठी सर्वधर्म समभावाची, वसुंधरेच्या रक्षणाची आणि मानवी मूल्यांच्या जोपासनेची शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप यांनी केले. वक्त्यांचा परिचय डॉ. बी. डी. अनुसे यांनी तर ऋग्वेद काळे यांनी आभार मानले.

> प्रशासनाची कार्यसंस्कृती ही जनतेशी संवादी असायला हवी. प्रत्येकाने मातृभाषेचा अभिमान ठेवावा. ज्या क्षेत्रात आपण आहोत तेथे चांगले करण्याचा प्रयत्न करावा. चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहणे हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण आहे. समाजसेवेची आस मनात असणारे कार्यकर्ते राजकारणात असावेत. सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यातील विश्वास निर्देशांक किती? त्यावर त्या देशाची प्रगती अवलंबून असते.
>
> -डॉ. ज्ञानेश्वर मुळे, सचिव परराष्ट्र मंत्रालय

**प्रभात** पुणे, मंगळवार, दि. ५ फेब्रुवारी २०१९

# लोकचळवळ उभारण्याची गरज

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे मत



**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू आहेत त्याला आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यातून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करून युवकांनी आपली उर्जा विधायक कामांकडे वळवावी. त्यासाठी चांगुलपणाची लोकचळवळ सुरू करण्याची गरज असल्याचे मत परराष्ट्र मंत्रालयातील निवृत्त सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी व्यक्त केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे' या विषयावर ते बोलत होते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. बी. डी. अनुसे, ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

या वेळी मुळे म्हणाले, की सामान्य लोक आणि राज्यकर्ते यांच्यातील विश्वास निर्देशांकावर देशाची प्रगती अवलंबून असते. चांगल्या माणसांनी राजकारणापासून दूर राहणे हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण आहे. समाजसेवेची आस मनात असणारे कार्यकर्ते राजकारणात असावेत. प्रशासनाची कार्यसंस्कृती ही जनतेशी संवादी असावी. प्रत्येकाने मातृभाषेचा अभिमान ठेवावा. हुतात्मा राजगुरू यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देऊ नका, असे विद्यार्थ्यांना आवाहन करत त्यांनी साहेबराव बुट्टेपाटील यांच्या कार्याचा गौरव केला.

**केसरी** पुणे, ३ फेब्रुवारी २०१९

# 'चांगुलपणाची लोकचळवळ उभी करण्याची गरज'

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** गरिबी, विषमता, भ्रष्टाचार, कुपोषण हे समाजाचे शत्रू असून त्याला आळा घालण्यासाठी स्वच्छता, शिस्त, परिश्रम यातून समाज व देशाची प्रगती करा. याच मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करून युवकांनी आपली उर्जा विधायक कामांकडे वळवण्यासाठी चांगुलपणाची लोकचळवळ स्वत:पासून सुरु करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन परराष्ट्र मंत्रालयातील निवृत्त सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत प्रत्येक दिवस, नवा दिवस, नवी क्षितिजे या विषयावर ते बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, अ‍ॅड. प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचे स्वागत व सत्कार संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे बोलताना पुढे म्हणाले की आज शिक्षण गावोगावी पोचले असले तरी समाज परिवर्तांची चळवळ थांबली आहे. त्यासाठी समाजाच्या राजकीय व सामाजिक संस्कृतीत अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानाप्रमाणे पहिल्यांदा मनाची स्वच्छता करायला हवी. शिक्षणाला नाविन्याची जोड देऊन तंत्रज्ञानाचा वापर समाज-जीवन संपन्न करण्यासाठी करायला हवा. समाजाच्या सर्व थरातील लोकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणायला हवे. यासाठी प्रत्येकाच्या मनातील प्रेमाचे दिवे पेटवून चांगुलपणाची लोकचळवळ सुरु करणे गरजेचे आहे.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख